# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०४/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ संबंधाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम नवमी शांततेत पार पडावे या अनुशंगाने पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे वतीने दिनांक ११/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथुन खापरखेडा परिसर तसेच संवेदनशिल वलनी व सिल्लेवाडा भागामध्ये रूट मार्च काढण्यात आला. सदरचा रूट मार्च हा मा. डॉ संतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कन्हान यांच्या मार्गदर्शनात काढण्यात आला असून सदर रूट मार्च मध्ये पोलीस स्टेशन खापरखेडाचे पोलीस निरिक्षक धनाजी जळक, सपोनि घोडमारे, पोउपनि मिश्रा, मपोउपनि नरोटे, १० पोलीस अमलदार, केंद्रीय सशस्त्र सुरक्षा बलाचे एक अधिकारी २० अंमलदार तसेच आर.सी.पी पथक व होमगार्ड सैनिक हजर होते.

तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सावनेर येथे ११/०४/२०२४ रोजी मा. श्री. अनिल म्हस्के साहेब भापोसे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली श्री रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांचे उपस्थितीमध्ये आगामी लोकसभा निवडणूक– २०२४ शांततेत पार पडावी या दृष्टिकोनातून रूट मार्च पोलीस ठाणे सावनेर – गांधी चौक– बस स्टॅन्ड – गडकरी चौक – जामा मस्जिद – कारोकर चौक– होळी चौक – जयस्तंभ चौक – गडकरी चौक– पोलीस स्टेशन सावनेर पर्यंत रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोलीस ठाणे सावनेर येथील ३ अधिकारी १६ अंमलदार १४ होमगार्ड व IRB पथक १ अधिकारी, २२ अंमलदार तसेच हेड क्वॉर्टरचे १ RSI , ९ अंमलदार असे एकुण ५ अधिकारी ४७ अंमलदार, १४ होमगार्ड होते.



पोस्टे सावनेर येथील रूटमार्च



<u>खापरखेडा शहरात पोलीसांचा रूट मार्च</u>

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर